जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 MAR 2023
सकाळ

# संजय धांडे नवे प्रमुख पाहुणे

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाचे स्वीकारले निमंत्रण

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ २९ मार्चला घेण्यास राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्याकडून मान्यता मिळाली. आता या समारंभासाठी आयआयटी कानपूरचे माजी संचालक आणि पद्मश्री संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. त्यांनी उपस्थितीबाबत विद्यापीठाला होकार कळविल्याने समारंभाच्या तयारीने वेग घेतला आहे.

विद्यापीठाने १६ फेब्रुवारीला दीक्षान्त समारंभ घेण्याचे निश्चित केले होते.



संजय धांडे

त्यासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे हे प्रमुख पाहुणे म्हणून ठरले. मात्र, तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अचानकपणे त्यांच्या पदाचा राजीनामा दिला. त्यावर विद्यापीठ प्रशासनाने काही अपरिहार्य कारणास्तव दीक्षांत समारंभ स्थगित करण्याचा निर्णय १३ फेब्रुवारीला जाहीर केला. त्यानंतर दीक्षांत समारंभ २९ मार्चला घेण्यास राज्यपाल बैस यांनी मान्यता दिली. त्याबाबत डॉ. सहस्त्रबुद्धे यांना विद्यापीठ प्रशासनाने कळविले. मात्र, पूर्वनियोजित इतर कार्यक्रमामुळे त्यांना या दीक्षान्त समारंभाला उपस्थित राहता येणार नाही. त्याबाबत त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला कळविले. त्यानंतर प्रशासनाने नवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबाबत पद्मश्री धांडे यांना निमंत्रण दिले. त्यांनी होकार दिला आहे. नावीन्यपूर्ण तंत्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक म्हणून ते परिचित आहेत. त्यांनी पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे सदस्य, भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून काम केले आहे. पुणे आणि कोलकाता येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स फॉर एज्युकेशन अँड रिसर्चसाठी व्हिजन डॉक्युमेंटची निर्मिती करण्यात त्यांनी योगदान दिले आहे. त्यांनी कॉम्प्युटर एडेड डिझाईन, रॅपिड प्रोटोटाइपिंग, रॅपिड टूलिंग आणि रिव्हर्स इंजिनीअरिंग या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. उज्जैन येथील अवंतिका विद्यापीठाच्या कुलपतीपदी ते सध्या कार्यरत आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात शहीद दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनीही शहिदांच्या प्रतिमांना पुष्प वाहून आदरांजली व्यक्त केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. महेश साळुंखे आदी उपस्थित होते.

24 MAR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आदिवासींमुळे जंगलांचे जतन : संपत देसाई

## 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावर परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आदिवासी समाजच जंगलांचे जतन व संरक्षण करीत असून नागर समाजामुळे त्याचे नुकसान होत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. या परिसंवादात ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड आणि संपत देसाई हे प्रमुख वक्ते सहभागी झाले होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



संपत देसाई म्हणाले, विकासाचे मोजमाप करताना प्रथम सर्व आदिवासी समाजाचे जगणे समजून घेणे आवश्यक आहे. या समाजाने प्रचंड निरीक्षण शक्तीच्या व पारंपरिक ज्ञानाच्या आधारे आपले जगणे समाधानाचे बनवले आहे. गरजेपेक्षा जास्त वृक्षांची तोड वा प्राण्यांची शिकार आदिवासी समाज करीत नाही. आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी वन हक्क कायद्याची अंमलबजावणी होऊन सामूहिक वन हक्काचे दावे मंजूर होणे आवश्यक आहे.

डॉ. प्रकाश राऊत म्हणाले, वनांमुळे जलचक्राचे नियमन व भूपृष्ठाचे संरक्षण होते. जमिनीची धूप कमी करण्यासाठी, प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीधारण क्षमता वाढविण्यासाठी जंगले उपयुक्त आहेत. उदय गायकवाड म्हणाले, आदिवासी हे नगर संस्कृतीपासून दूर असलेले मूळ रहिवासी असून, आर्य आणि द्रविड संस्कृतीच्याही अगोदर या देशात त्यांचे वास्तव्य आहे. देशाच्या विविध भागात हा समाज जंगलामध्ये आढळून येतो. डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, चिरंतन विकास घडवून आणायचा असेल तर आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे व तेच विकासाची पहिली पायरी असायला पाहिजे.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी परिसंवादाचे समालोचन केले. मुक्तसंवादाचे संचालन डॉ. अमोल मिनाचेकर यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक अविनाश भाले यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. नितीन माळी यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
24 MAR 2023 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीरांच्या शिक्षण कार्याचा तुलनात्मक अभ्यास व्हायला हवा - डॉ. प्रकाश पवार

लोकसत्ता वार्ताहर

**वाईः** जागतिक शिक्षण तज्ज्ञ जॉन ड्युई यांनी शिक्षण क्षेत्रात विविध प्रयोग केले. त्या प्रकारचे प्रयोग साताऱ्यामध्ये कर्मवीर व लक्ष्मीबाई पाटील यांनी अगोदरच सुरू केलेले दिसून येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण कार्याचा तुलनात्मक अभ्यास व्हायला हवा, असे मत शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांच्या ९३ व्या पुण्यतिथी कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे डॉ.अनिल पाटील होते. या वेळी कर्मवीर कुटुंबीय,संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य माजी प्राचार्य आर.डी.गायकवाड. ॲड.दिलावर मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती होते.

पवार पुढे म्हणाले,की तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. हमीद अली यांना कर्मवीरांनी चार भिंतीचा डोंगर मागितला. त्या वेळी डॉ. हमीद अली यांनाही आश्चर्य वाटले पण पुढे अण्णांनी स्वतःच्या हिमतीवर व विद्यार्थ्यांच्या मदतीने श्रमप्रतिष्ठा हे मूल्य जपत या भूमीवर डोंगराला लागून इमारती उभ्या केल्या. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, महात्मा फुले, शाहू महाराज महात्मा गांधी ही अण्णांची प्रेरणास्थाने होती. म्हणूनच या महापुरुषांची प्रेरणा कायम राहावी म्हणून त्यांनी साताऱ्यामध्ये त्यांच्यानावाने ज्ञानमंदिरे उभे केली. अण्णांची दृष्टी आधुनिक व विशाल होती. परंपरा आणि आधुनिकता यांचा मेळ कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई यांनी घातला. शिक्षण म्हणजे केवळ बोलणे नाही,स्वातंत्र्य ,समता ,सहजीवन ,प्रेरणा ,बंधुभाव हा मूल्यविचार त्यांच्या शिक्षण विचारात दिसतो असे ते म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
2 4 MAR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर ३१७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेअंतर्गत गुरुवारी बी.व्होक., एमबीए, बीसीए आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजअखेर ३१७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ लॉ, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर, बॅचलर ऑफ सायन्स ॲनिमेशन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये, अधिविभागात सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला १ हजार ७३७ विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात हुतात्म्यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (ता. २३) हुतात्मा दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थितांनीही हुतात्म्यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून आदरांजली वाहिली. प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले, शिवलिंगप्पा सपली, महेश साळुंखे उपस्थित होते.

तरूण भारत



चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय अंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत उपविजेतेपद पटकाविलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# शिवाजी विद्यापीठ संघास उपविजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

- आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धा
- चंदीगढ विद्यापीठाकडून निसटता पराभव

चंदिगड येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी संघास उपविजेतेपद मिळाले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चंदीगढ विद्यापीठाकडून निसटत्या पराभवास सामोरे जावे लागले. स्पर्धेतील विजेत्या, उपविजेत्या संघास विधी विभागाच्या प्रमुख रतिंदरपाल सिंग, क्रिडा संचालक देवेंद्र सिंग यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेतील मानांकनाच्या सामन्यात कुरुक्षेत्र विद्यापीठाविरुद्ध शिवाजी विद्यापीठाने ४ – २ असा विजय मिळवून अंतिम चार संघात स्थान मिळवत साखळी फेरीत प्रवेश केला. मंगळवारी झालेल्या पहिल्या साखळी सामन्यात कालिकत विद्यापीठाचा १ – ४ असा पराभव करून दोन गुणांची कमाई केली तर दुसऱ्या सामन्यात दिल्ली विद्यापीठाचा तब्बल १७ – १ असा एकतर्फी धुव्वा उडवला. तर तिसऱ्या साखळी सामन्यात मात्र पंचांच्या चुकीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या महिलांना एक शून्य अशा पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे यजमान चंदिगड विद्यापीठ प्रथम शिवाजी विद्यापीठ द्वितीय व कालिकत विद्यापीठ आणि दिल्ली विद्यापीठ यांना संयुक्त तिसरे स्थान मिळाले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशात आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिने जोरदार पिचिंग केले. तिच्या पिचिंग पुढे संपूर्ण भारतातून आलेल्या एकाही खेळाडूचा निभाव लागला नाही. तिला कॅचर ऐश्वर्या पुरी हिने अचूक साथ दिली. त्याचबरोबर करिष्मा कुडचे, पल्लवी कांबळे, साक्षी लगाडे, सुजात्ता थोरवडे, सृष्टी कदम, वेदश्री पाटील यांनी फलंदाजी मध्ये चांगली साथ दिली. संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसूचिव डॉ. व्ही एन शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

**विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे**

स्वप्नाली वायदंडे (कर्णधार), ऐश्वर्या पुरी, करिष्मा कुडचे, पल्लवी कांबळे, सानिका संकपाळ, गौरी माळी, आलिशा कांबळे, सृष्टी कदम, निरुपमा कांबळे, वेदश्री पाटील साक्षी लगाडे, सुजाता थोरवडे, निकिता जाधव, दीक्षा शिंदे, शितल जाधव, राधिका कळंत्रे, प्रशिक्षक सुशांत कायपुरे, संघ व्यवस्थापक डॉ. बाबासो उलपे.